११८

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**
**प्रशासन विभाग / पथक-१**

क्र.प्र/आस्था१०/मा.अ.अ.२००५/१८८२/२०२४ दिनांक : 31 OCT 2024

**: परिपत्रक :**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. अहत-१००८/ प्र.क्र.१८ /०८/११-अ, दि.१५/०५/२००८ तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा, दि.०१/०२/२०१७ अन्वये सर्व जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची माहिती सर्वसामान्यांस सहज उपलब्ध होऊ शकेल अशी त्यांच्या विभागात दर्शनी भागावर लावावी असे नमुद करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणात नियुक्त करण्यात आलेल्या प्रथम अपीलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी तसेच कामे/प्रकल्पांची नावे इत्यादी तपशीलवार माहिती विहित नमुन्यात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

याबाबत असे कळविण्यात येते की, प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांच्या होणा-या बदल्या, सेवानिवृत्ती इत्यादी कारणास्तव प्रथम अपिलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी कामे / प्रकल्पांची नावे यात होणारे बदल याबाबतची माहिती प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे अत्यंत महत्वाचे असल्याने प्राधिकरणातील सर्व विभाग प्रमुखांना सदर परिपत्रक निर्गमित करुन विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांन सुचित करावे की, आपल्या विभागातील प्रथम अपीलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी तसेच कामे/प्रकल्पांची नावे याची माहिती विहीत नमुन्यात अद्ययावत करुन (Soft copy) प्राधिकरणाच्या माहिती व तंत्रज्ञान कक्ष (IT Cell) यांचेमार्फत संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशील (Hard Copy) विहीत नमुन्यात कोणताही बदल न करता A4 साईजच्या आडव्या शीट मध्ये अवलोकनार्थ कर्मचारी वर्ग अधिकारी, प्रशासन विभाग यांचे कडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत न चुकता सादर करण्यात यावी.

सदर परिपत्रक मा. अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

२९/१०/२०२४.
**कर्मचारी वर्ग अधिकारी**

प्रति,

१ संचालक (प्रकल्प) मेट्रो अंमलबजावणी शाखा
२ संचालक (प्रणाली) मेट्रो अंमलबजावणी शाखा
३ संचालक (कामे) मेट्रो अंमलबजावणी शाखा
४ वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग
५ प्रमुख, सामाजिक विकास कक्ष
६ प्रमुख, अभियांत्रिकी विभाग
७ मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग

...२/-

METRO LAND / MMRDA
INWARD / OUTWARD
NO ३३३
DATE ५/११/२०२४

MSRevdar
Mahesh (C.O.)